**शपथेवर पुढील सरतपास श्री. एस. के. मन्सुरी अधिवक्ता अर्जदारा तर्फे :—**

०४.   शपथपत्र नि.क्र. यु—०६ मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. कागदपत्र यादी नि. यु—२ सोबत अनु. क्र. ०१ वरील तक्रार युएलपी क्र. १८/१९९० मधिल न्यायनिर्णय, अनु. क्र. ०२ वर पेमेंट स्लिप च्या प्रमाणित प्रती सादर केलेल्या आहेत सदर न्यायनिर्णय व पेमेंट स्लिप च्या प्रती ला **नि. यु—०७** व **यु—०८** देण्यात आली. नि. यु—२ सोबत अनु. क्र. ०४ वरील स्मरणपत्र, अनु. क्र. ०५ वरील विनंती अर्जाच्या स्थळप्रती माल दाखविल्या त्यावर माझे सहया आहेत त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. स्मरणपत्र व विनंती अर्जास **नि. यु—९** व **यु—१०** देण्यात आले. कागदपत्र यादी नि. यु—२ सोबत अनु. क्र. अनु. क्र. ०६ वरील मुख्याधिकारी न. प. यांनी मला कामावरून कमी केल्याबाबतचा आदेश मला दाखविला सदर आदेशाला **नि. यु—११** देण्यात आली. कागदपत्र यादी नि. यु—२ सोबत अनु. क्र. ०७ व ०८ वरील मी मुख्याधिकारी नगर परिषद, ब्रम्हपूरी यांना दिलेल्या अर्जाच्या स्थळप्रती दाखविल्या त्यावर माझे सहया आहेत त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर अर्जाच्या स्थळप्रती ला **नि. यु—१२, यु—१३** देण्यात आली. कागदपत्र यादी नि. यु—२ सोबत अनु. क्र. ०९ वरील नगर परिषद यांनी मला दिलेले पत्र मला दाखविले सदर पत्रास **नि. यु—१४** देण्यात आले. कागदपत्र यादी नि. यु—२ सोबत अनु. क्र. १० व ११ वरील मी माझे

जेष्ठ नागरिक ओळखपत्र व आधारकार्डच्या छायांकित प्रती दाखल केलेल्या आहेत. मुळ आधार कार्ड व जेष्ठ नागरिक ओळखपत्र मी सोबत आणले आहे. सदर मुळ आधार कार्ड व जेष्ठ नागरिक ओळखपत्र पाहिले असता अभिलेखावर दाखल छायांकित प्रती हया ख—या व बरोबर असल्याचे दिसून येते त्यामुळे त्यांना अनुक्रमे **नि. यु—१५, यु—१६** देण्यात आले.

उलटतपास गैरअर्जदार यांचे विधीज्ञ श्री टंडन यांच्या विनंतीवरून तहकुब करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/—
(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. ०४.०८.२०२५.